# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ३७४/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:–०२/०७/२०१६.

**१) अल्पवयीन मुलास फुस लावुन पळवुन नेले. :–**

दिनांक ३०/०६/०१६ रोजी १७.०० वा. दरम्यान फिर्यादीचा अल्पवयीन मुलगा वय १७ वर्ष ४ महीने हा दि. ३०/०६/२०१६ ला १७.०० वा दर. घरून भंडारा येथे नोटबुक घेण्यासाठी गेला होता. तो पर्यत घरी परत आला नाही. मुलास कोणीतरी अज्ञात आरोपीने पळवुन नेले असावे असे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट व शासन परिपत्रक क्र. सीआरटी ०९१२/प्र.क्र.५४/पोल–१३ गृहविभाग दि. १०/११/२०१४ चे अन्वये पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ३६३ भादंवी अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. गोपाले पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

**२) शेतातुन जाण्याच्या कारणावरून अश्लिल शब्दात शिवीगाळ करून धमकी दिली. :–**

दिनांक ०१/०७/०१६ रोजी ०९.०० वा. दरम्यान फिर्यादी ईश्वर नारायण मेहर वय ६७ वर्ष, रा. डोंगरगाव हे त्यांच्या शेतामध्ये पाणदन रत्याने जात असतांना दोन्ही आरोपीतांनी शेतातुन जाण्याच्या कारणावरून भांडण करून अश्लिल शब्दात शिवीगाळ केली व जिवाने मारण्याची धमकी दिली. असे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम २९४,५०६ भादंवी अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बाभरे पो.स्टे. आंधळगाव हे करीत आहेत.

**३) सार्वजनिक ठिकाणी वाहतुकीस अडथळा व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभे करून मिळून आल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक ०१/०७/०१६ रोजी १३.०० ते १३.३० वा. दरम्यान टाटा मॅजिक गाडी क्र. एमएच ३३ आर ३३७६ च्या आरोपी चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन तहसिल टी पॉईट समोर सार्वजनिक ठिकाणी आमरोडवर उभे करून येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांना अळथडा निर्माण करतांना मिळुन आला. असे सर तर्फे फिर्यादि पोना. रामटेके पो.स्टे. पवनी यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २८३ भादंवी अन्वये दाखल करण्यात आला. तपास पोना. रामटेके पो.स्टे. पवनी हे करीत आहेत

**४) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :–**

दिनांक ०१/०७/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १५४ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी वाहतुक करणा–यांवर ०४ केसस, तिन सिटर वाहनांवरती २० केसेस व इतर वाहनांवरती १३० केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(के.एच.धात्रक)
प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ९८२३६३७२२०

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.